किरकोळ अर्ज .क्रं. ४७/२०२४
ई-फाईलिंग प्रकरण
बाबुराव -वि- अनुसया
**निशाणी क्र. ०९ पुढे**

**<u>अर्जदाराची उलटतपासणी आक्षेपकर्ताचे वकिल श्री. बोगामी यांचे व्दारे,</u>**

२. मी माझे मामा-मामीचे पालन पोशन केले होते त्यामुळे सदरचे अर्ज मी त्यांचा वारसाण आहे म्हणुण दाखल केले आहे. मी आक्षेपकर्ती अनुसया भांडेकर यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मृत्तक शांताबाई ही मृत्तक तुकारामची दुसरी पत्नी होती. शांताबाई वर्ष २०१४ मध्ये मय्यत झाल्या. मला मृत्तक तुकारामचे पहिल्या पत्नीचे नाव माहिती नाही. मृत्तक तुकाराम हे मरदमालेंगा या गावाचे रहिवासी होते. हे म्हणणे खरे आहे की, भुमापण क्रं. ३६, ३९, ४६ व ७० मय्यत तुकाराम गव्हारे यांचे नावाने होते. हे म्हणणे खरे आहे की, अनुसया गोपाळा भांडेकर हि मय्यत तुकाराम गव्हारे यांच्या पहिल्या पत्नीची मुलगी आहे. हे म्हणणे खरे आहे की, आक्षेपकर्ती अनुसया भांडेकर यांनी मी केलेल्या अर्जाचे अगोदर वारसाण प्रमाणपत्रा करीता अर्ज केला होता व त्यामध्ये मी लक्ष दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मृत्तकांचे वारस नसल्याने मला वारसप्रमाणपत्र मागता येत नाही तरीही खोटा अर्ज दाखल करुन खोटी मागणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटे शपथपत्र दाखल करुन आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपासणी पुर्ण,</u>**

**<u>फेरतपासणी नाही.</u>**

दि. ०५/०२/२०२५

श्रवणोत्तर स्वीकृत,

(एस.एम.एच. शाहीद)
दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर,
अहेरी

समक्ष

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2025.02.05 18:18:02 +0530

(एस.एम.एच. शाहीद)
दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर,
अहेरी